# जिल्हा परिषदचंद्रपूर,

# विशेष पदभरती मोहिमेअंतर्गत अनुसूचीत जमाती प्रवर्गासाठी आरक्षीत असलेली पदे नामनिर्देशनाव्दारे भरतीसाठी जाहिरात सन २०१९

# क्रमांक-२६११/२०१९ दि.२६/१२/२०१९.

------------------------------

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१ डिसेंबर २०१९,महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग पत्र क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.२२६/भाग-२/आस्था ८ दि. २३ डिसेंबर २०१९,महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.२२६/भाग २/आस्था ८ दि.२४ डिसेंबर २०१९ व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जुन २०१८, अन्वये विहित तरतूदी आणि निर्देशानुसार जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत विविध संवर्गातील अनुसूचीत जमातीसाठी आरक्षीत असलेली पदे विशेष भरती मोहिमे अंतर्गत सरळसेवेने भरण्याकरिता ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. खाली नमुद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विहित अर्हताधारक अनुसूचीत जमाती प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र धारक पात्र उमेदवारांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,चंद्रपूर यांचे कार्यालयात दि. ०६ जानेवारी २०२० ला सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत आपले अर्ज सादर करावेत.

## अर्ज करण्याची पध्दत

| | | |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत परीक्षेकरीता फक्त ऑफलाईन पध्दतीनेच अर्ज सादर करण्याचा अंतीम दिनांक ०६ जानेवारी २०२० ला सायंकाळी ५.४५ वाजेपर्यत कार्यालयीन वेळेतच कार्यालयात पोहचतील तेच अर्ज स्विकारण्यात येतील. | |
| २ | पात्र उमेदवारांना ऑफलाईन अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,चंद्रपूर यांचे कार्यालयात जाहिरातीच्या दिनांकापासून ते दि.०६ जानेवारी २०२० ला सायंकाळी ५.४५ वाजेपर्यत या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. | |
| ३ | परीक्षेचे आयोजन दि.१२ जानेवारी २०२० ते दि. १३ जानेवारी २०२० या कालावधीत करण्यात येईल. | |
| ४ | लेखी परीक्षेतील पात्र उमेदवारांची कागदपत्र तपासणी,चारित्र्य पडताळणी,वैद्यकीय तपासणी दि.२५ जानेवारी २०२० पर्यंत करणे बंधनकारक राहील. | |
| ५ | अर्जाचा नमुना व लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन जिल्हा परिषदेच्या www.zpchandrapur.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावा. | |
| ६ | लेखी परिक्षेकरीता प्रवेशपत्र उमेदवाराने दि. १० जानेवारी २०२० ते ११ जानेवारी २०२० या कालावधीत कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे कार्यालयातून प्राप्त करणे बंधनकारक राहील. लेखी परिक्षा प्रवेशपत्र पोष्टाने किंवा अन्य मार्गाने पाठवीले जाणार नाही याबाबत उमेदवाराने नोंद घ्यावी. | |

## परीक्षा शुल्क

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसूचीत जमाती उमेदवाराकरिता | रु.१५०/- |
| 2 | माजी सैनिक उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. | |

- **परीक्षा शुल्क हे मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,चंद्रपूर यांचे नावाने चंद्रपूर शाखेला देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा मागणी धनाकर्ष (D.D.)अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.**

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.zpchandrapur.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमुद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून पदाला आवश्यक शैक्षणिक अर्हतेसह ऑफलाईन पध्दतीनेच मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,चंद्रपूर यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा बेताने अर्ज सादर करावेत. जिल्हा परिषद चंद्रपूरच्या संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार,(सामाजिक अथवा समांतर आरक्षणात अंशत:/पुर्णत: बदल करणे, संवर्गनिहाय एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष,जिल्हा निवड समिती, चंद्रपूर यांना असतील.

**अनुसूचीत जमातीसाठी राखीव असलेली पदे भरणेसाठी विशेष भरती मोहिमेद्वारे जिल्हा परिषद,अंतर्गत नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल खालील प्रमाणे आहे.**

१) **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (लघूसिंचन)**

| प्रवर्ग | अनुसूचीत जमाती | एकुण पदे |
|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ |
| महिला | १ | १ |
| एकुण पदसंख्या | २ | २ |

२) **स्थापत्य अभियांत्रिकी सहायक**

| प्रवर्ग | अनुसूचीत जमाती | एकुण पदे |
|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ |
| महिला | १ | १ |
| एकुण पदसंख्या | २ | २ |

३) **कनिष्ठ सहायक (लेखा)**

| प्रवर्ग | अनुसूचीत जमाती | एकुण पदे |
|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ |
| एकुण पदसंख्या | १ | १ |

४) **परिचर (वर्ग ४)**

| प्रवर्ग | अनुसूचीत जमाती | एकुण पदे |
|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ |
| एकुण पदसंख्या | १ | १ |

**टिप :-१)** समांतर आरक्षणांतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

**वरील कोष्टकात नमुद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

**परिशिष्ठ-अ**

## पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व परिक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (लघूसिंचन) | S-१४- ३८६००-१२२८०० | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करुन असतील अशा उमेदवारामधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. | |
| 2 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | S-८- २५५००-८११०० | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील,आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाचा राज्य सरकारच्या शासकीय तांत्रिक शिक्षण विभागाने आयोजीत केलेला एक वर्षाचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार किंवा खालील 5 पाठयक्रम<br>१) किमान स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण ही अर्हता किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषीत केलेली अर्हता<br>२) आर्किटेक्चरल ड्राफटसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक)<br>३) कन्सट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक)<br>४) आरेखक (स्थापत्य)<br>५) सैनिकी सेवेतील कन्सट्रक्शन सुपरवायझर अनुभवाचे प्रमाणपत्र<br>किंवा स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण ही अर्हता किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषित केलेली अर्हता.स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीकाधारक/पदवीधारक/पदव्युत्तर अशी उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार देखील पात्र राहतील. | |
| ३ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | S-६- १९९००-६३२०० | १)माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील.<br>2) महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचा-यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकीय | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | परीक्षा विभाग शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनीटास 30 शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारामधून नाम निर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.परंतु असे की,इंग्रजी विषय घेवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समुतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. | |
| ४ | परिचर (वर्ग 4) | S-१- १५०००-४७६०० | मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीतकमी इय्यता ४ थी उत्तीर्ण असलेले उमेदवार. परंतू आकस्मीता निधीतून वेतन दिल्या जाणाऱ्या पुर्ण कालीन किंवा अंशकालीन आस्थापनेवर किमान सलग ३ वर्ष एवढया कालावधीकरीता काम केलेल्या व्यक्तीना अधिक पसंती दिली जाईल. | |

**वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १) | संगणक अर्हता :- | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस २०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४.२.२०१३ व शासन पुरक पत्र क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ८.१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. **(परिचर वर्ग ४ वगळून)** |
| २) | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासह सादर करणे उमेदवारांना बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

**५) वरील सर्व पदांसाठी परिक्षेचे स्वरुप व दर्जा**
**वरील सर्व पदांकरीता लेखी पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.**

| अ. क्र. | पदाचे नांव / संवर्ग | भाग-१ इंग्रजी | भाग-२ मराठी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ तर्कक्षमता / अनुमानात्मक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकुण प्रश्न | एकुण गुण | नकारात्मक गुणदान | परीक्षेचा कालावधी( मिनीटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | प्रश्न गुण | एकुण प्रश्न | | | | |
| १ | **कनिष्ठ अभियंता** (स्थापत्य) (लघूसिंचन) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१२ वी | इ.१२ वी | पदवी | पदवी | पदवी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| २ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१० वी | इ.१० वी | इ.१० वी | इ.१० वी | इ.१० वी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| ३ | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)** | २५ | २५ | २५ | २५ | ० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१० वी | इ.१० वी | इ.१० वी | इ.१० वी | | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | | |
| ४ | **परिचर (वर्ग-४)** | परिक्षेचे माध्यम | मराठी संबधीत प्रश्न (२०) | सामान्य ज्ञान संबधीत प्रश्न(२०) | बुध्दीमापन व गणीत संबधीत प्रश्न(१०) | --- | | | | |
| | एकुण गुण | --- | ४० | ४० | २० | --- | ५० | १०० | नाही | ९० मी. |
| | प्रश्न पत्रिकेचे दर्जा | --- | इ. ४ थी दर्जा | इ. ४ थी दर्जा | इ. ४ थी दर्जा | --- | | | | |

## (१) लेखी परीक्षेचा दर्जा / स्तर

१. लेखी परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या-त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

२. ज्या पदांकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

## (२) लेखी परीक्षेव्दारे निवडीची कार्यपध्दती

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक १३ जून २०१८ नुसार गट-क संवर्गातील पदे भरतांना खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

१. गट क मधील सर्व पदांकरीता उमेदवारांची निवड करतांना २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल व परिचर वर्ग ४ पदाकरीता १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

२. अशा परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे किमान ४५ % गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधुन निवड सुची तयार करण्यात येईल.

३. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या तांत्रिक संवर्गातील पदांच्या तांत्रिक भागाचे प्रश्न इंग्रजी माध्यमातुन राहतील.

## (३) निवड सुची व तीची कालमर्यादा

निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

## (४) समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती

साप्रवि शासन पूरक पत्र क्रमांक: प्रानिमं-१२१७/(प्र.क्रं.९२/१७)/१३-अ, दिनांक ०२ डिसेंबर,२०१७ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं १२१६/(प्र.क्रं.६५/१६)/१३-अ, दिनांक १३ जून,२०१८ अन्वये परीक्षेचा निकाल तयार करतांना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| **अ)**आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| **ब)** वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| **क)** समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता (पदयुत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल) |
| **ड)** वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

## (५) सर्वसाधारण सुचना

उमेदवारांना परीक्षे करीता अर्ज सादर करीत असतांना पदाला आवश्यक असलेली सर्व कागदपत्राची छायांकीत प्रत स्वसाक्षांकीत करुन अर्जासोबत सादर करावे. निवडसूचीमध्ये पात्र उमेदवारांना मुळ दस्तऐवज पडताळणी केल्यानंतरच अंतीम नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा. | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुण्यातील दाखला कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे अनिवार्य राहिल. |

## (६) वयोमर्यादा

**अ)**

I) अनुसूचीत जमातीच्या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहित वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

II) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अनुसूचीत जमातीच्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी नसावे व ४३ वर्ष पेक्षा अधिक नसावे.

## ब) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विहित वयोमर्यादेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | शासन निर्णयानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | **४३ वर्षे** |
| २ | अपंग उमेदवार | **४५ वर्षे** |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भुकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ च्या जनगणना/सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ६ | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य | |
| ७ | शासकीय कर्मचारी/ जिल्हा परिषद नियमीत कर्मचारी/ (नियुक्ती प्राधिकारी/सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक राहील.) | |
| ८ | अंशकालीन कर्मचारी | **५५ वर्षे** |
| ९ | उच्च गुणवत्ता धारक खेळाडु उमेदवार | **सर्व प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे** |
| १० | माजी सैनिक | **सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २० ऑगस्ट २०१० अन्वये उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील. तसेच अपंग माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.** |

**या शिवाय विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.**

## (७) अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-

उमेदवारांनी जि.प.संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला अर्ज परीपूर्ण भरून व त्यासोबत आवश्यक ते दस्तऐवज स्वसाक्षांकीत करुन तसेच प्रवेश पत्राकरीता एक फोटो सह जिल्हा परिषद,चंद्रपूर येथे स्वत: किंवा अर्ज स्विकारण्याच्या अंतीम तारखेपूर्वी जि.प.चंद्रपूर कडे पोहचतील अशा बेताने सादर करावे.

## (८) महत्त्वाच्या सूचना:

| | |
|---|---|
| १) | १) उमेदवारांना प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.<br>२) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थिती मध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादि अशा कारणांसाठी ) परत केले जाणार नाही.<br>3) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी एक सध्याचे वैध फोटो ओळखपत्र पुरावा म्हणुन सोबत ठेवणे आवश्यक आहे.<br>(१) पॅनकार्ड, (२) पासपोर्ट, (३) वाहन अनुज्ञप्ती (४) मतदार ओळखपत्र (५) फोटोसह राष्ट्रीयकृत बँक पासबुक<br>(६) मूळ आधारकार्ड |
| २) | उमेदवारास विभागीय परीक्षा तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/ तिला परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. (परिचर वर्ग ४ वगळून) |
| ३) | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ४) | उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा,विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल.अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केलप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्ठात आणणे इत्यादि कारवाई केली जाईल. |
| ५) | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणुक रद्द केली जाईल. |
| ६) | फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवारांचे ऑफलाईन पध्दतीने अर्ज परीक्षा शुल्क व आवश्यक ते दस्तऐवजासह दि.०६ जानेवारी २०२० ला सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी किंवा यानंतर या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. |

| | |
|---|---|
| ७) | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही कारणामुळे विहित दिवशी परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परीक्षा घेतली जाईल. |
| ८) | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही . |
| ९) | उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरीता मुलाखती नसल्याने प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल,मुळ कागदपत्रांची छाणनी अंती व आक्षेप / हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. |
| १०) | अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी ०७१७२-२५५१९२ या दुरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. |

## (९) विशेष सूचना

| | | |
|---|---|---|
| | १) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/१००५/१२६ सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दिनांक ०१.०४.२०१५ पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. | |
| | 2) महिला उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या-त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होवू शकेल. | |
| | 3) निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकिय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल. | |
| | ४) पात्रता परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षेसंबंधी सुचना या दिनांक १० जानेवारी २०२० व दि. ११ जानेवारी २०२० ला जिल्हा परिषद,चंद्रपूर येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.उमेदवारानी उक्त तारखेला उपस्थित राहून प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. | |
| | ५) सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होवू शकतो. | |
| | ६)समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या अनुसूचीत जमातीच्या उमेदवारांना शासनानी वेळोवेळी समांतर आरक्षणासंदर्भात निर्गमीत केलेले शासन अधिसूचना, निर्णय, परिपत्रक व पत्र यामधील निर्देश व निकष लागू राहतील याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी. | |

## (१०) इतर सर्वसाधारण सुचना

| | | |
|---|---|---|
| | **१)** ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑफलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत. अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही. | |
| | **२)** अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. | |
| | **३)**शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर २०१९ मधील निर्देशानुसार उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र धारण करणे बंधनकारक राहील. | |
| | ४) शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. | |
| | ५) ऑफलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परीक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. | |
| | ६) निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. | |
| | ७) चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून असल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. | |
| | ८) निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती सेवाप्रवेशोत्तर परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील. | |
| | ९) अपरिहार्य कारणास्तव किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर जिल्हा निवड समिती ठरवून देईल त्या प्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल. याबाबत जि.प.संकेतस्थळावर सूचना देण्यात येईल ती पाहण्याची | |

| | | |
|---|---|---|
| | जबाबदारी उमेदवाराची राहील. | |
| | १०)लेखी परीक्षेस ,प्रवेशपत्र स्विकारण्यास तसेच पात्र ठरल्यास कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. | |
| | ११) निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्द करण्यात येईल. | |
| | १२) वरील अटी व शर्ती नियमा व्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहील. | |
| | १३) जाहिराती मधील काही मद्दे शासन निणर्याच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. | |
| | १४) **समान गुण आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे पाल्य** :- उमेदवारांना समान गुण मिळाल्यास उमेदवारांची गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं-१२१६/प्रक्र-६५/१६/१३-अ,दिनांक १३ जून २०१८ मधील तरतुदीनुसार निश्चित करणेत येईल. यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. | |
| | १५) शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-२०१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ५.१०.२०१५ मधिल तरतुदी नुसार लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याचा शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा सांक्षाकित प्रतिसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. | |
| | १६) सदर पदभरती संबधाने काहि महत्वाच्या सुचना असल्यास त्या जिल्हा परिषद नोटीस बोर्ड तसेच जिल्हा परिषद, चंद्रपूरच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात येईल. सदर सुचना जिल्हा परिषद, चंद्रपूर च्या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देवून पाहण्याची जबाबदारी ही उमेदवाराची राहील. | |
| **(११). परीक्षेस प्रवेश** | | |
| | **१)** लेखी परीक्षा**,**लेखी परिक्षेकरीता प्रवेशपत्र प्राप्त करणे व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल. | |
| | **२)** लेखी परिक्षेच्या वेळी फक्त पेन, परिक्षा प्रवेशपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल. | |
| | ३) डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंर्तभुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्ल्यू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रानिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. | |
| | ४)परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशव्दारावरच ठेवावे लागेल. अशा साधन /साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद प्रशासन किंवा परीक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही. | |

स्वा/-
सदस्य,जिल्हा निवड समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,चंद्रपूर

स्वा/-
अध्यक्ष,जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी,चंद्रपूर

<u>जिल्हा परिषदचंद्रपूर,</u>

**विशेष पदभरती मोहिमेअंतर्गत अनुसूचीत जमाती प्रवर्गासाठी आरक्षीत असलेली पदे**
**नामनिर्देशनाव्दारे भरतीसाठी जाहिरात सन २०१९**

# अर्जाचा नमुना

Application NO.:-

| उमेदवाराचा<br>अलिकडे काढलेला<br>फोटो व त्याखाली<br>उमेदवाराची स्वाक्षरी |
|---|

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,चंद्रपूर

**विषय : विशेष भरती मोहिमे अंतर्गत अनुसूचित जमाती या प्रवर्गात राखीव असलेल्या --------------**
**या पदाकरीता अर्ज सन 2019**

आपले जिल्हा परिषदेचे संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली विस्तृत जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असुन जाहीरातीचे अनुषंगाने माझ्या जातीचा प्रवर्ग हा अनुसूचित जमाती असुन मी ,--------------------------------- या पदासाठी अर्ज करीत आहे. सदर पदाकरीता आवश्यक असलेली माहिती खालील प्रमाणे असुन मी, सदर अर्जासह विस्तृत जाहिरातीनूसार खालील प्रमाणे आवश्यक ते दस्तऐवजाच्या छायाप्रती स्वसाक्षांकीत करून जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | उमेदवाराचे पूणे नांव (नांव प्रथम) (मराठीमध्ये) | |
| | (In Capital Letter) (इंग्रजीमध्ये) | |
| 2 | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड क्रमांकासह)<br>दुरध्वनी क्रमांक/ भ्रमणध्वनी क्रमांकासह | |
| 3 | जात/पोटजात/ जातीचा प्रवर्ग | |
| 4 | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक<br>(छायाप्रत जोडणे आवश्यक) | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | जन्मतारीख (अंकात) | | | | | | | | |
| | जन्मतारीख (अक्षरात) | | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | दिनांक :- 06 / 01 /2020<br>रोजीचे वय | **वर्ष** | | **महिने** | | **दिवस** | |
| 8 | जन्म ठिकाण | **गांव** | | **तालुका** | | **जिल्हा** | |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | उमेदवार खालील प्रवर्गापैकी असल्यास संबंधित प्रवर्ग नमुद करावा. ((√) अशी खूण करावी.) | | |
| | अ | उमेदवार पुरुष आहे की स्त्री | **पुरुष/स्त्री** |
| | ब | उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी आहे काय ? (अधिवास प्रमाणपत्र आवश्यक) | **होय/नाही** |
| | क | उमेदवार माजी सैनिक आहेत काय ? | **होय/नाही** |
| | ड | उमेदवार प्रकल्पग्रस्त आहेत काय ? | **होय/नाही** |
| | इ | उमेदवार भूकंपग्रस्त आहेत काय ? | **होय /नाही** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ई | उमेदवार पदविधर अंशकालीन आहेत काय ? | | | | **होय /नाही** |
| | उ | उमेदवार अपंग आहेत काय ? | | | | **होय/नाही** |
| | | **अपंगत्वाचा प्रकार** | **क्षीणदृष्टी ( )** | **अस्थिव्यग ( )** | **कर्णबधीर ( )** | **मुकबधीर ( )** |
| | ऊ | उमेदवार आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्यस्तरीय/आंतर विद्यापिठ स्तरीय खेडाळू आहेत काय ? | | | | **होय/नाही** |
| | | **असल्यास खेळाचा प्रकार** | | | | |
| | ए | उमेदवार शासकीय कर्मचारी आहेत काय ? | | | | **होय/नाही** |
| | | असल्यास दस्तऐवज पडताळणीच्या वेळेस कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | **राष्ट्रीयकृत बॅंकेचे नाव व शाखा** | **मागणी धनाकर्ष क्र. (D.D. No.)** | **दिनांक** | **रक्कम** |
| | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | **शैक्षणिक अर्हता** | | | | |
| | **अ.क्र.** | **शैक्षणिक पात्रता** | **संस्थेचे/मंडळाचे नांव** | **प्राप्त गुणाची टक्केवारी** | **परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** |
| | 1 | इयत्ता 4 थी पास | | | |
| | 2 | एस.एस.सी.(10 वी) | | | |
| | 3 | एच.एस.सी. (12 वी) | | | |
| | 4 | पदविका | | | |
| | 5 | पदवी | | | |
| | 6 | पदव्युत्तर पदवी | | | |
| | 7 | संगणक प्रमाणपत्र | | | |
| | 8 | मराठी टंकलेखन | | | |
| | 9 | इंग्रजी टंकलेखन | | | |
| | 10 | लघुटंकलेखन | | | |
| | 11 | इतर | | | |

| | | |
|---|---|---|
| 12 | जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजगता मार्गदर्शक अधिकारी/जिल्हा समाजकल्याण/आदिवासी प्रकल्प अधिकारी यांचेकडे नांव नोंदणी केली आहे काय ? | होय/नाही (असल्यास) ठिकाण):-<br>नोंदणी क्रमांक :-<br>दिनांक :- |
| 13 | जिल्हा सैनिक मंडळाकडे नांव नोंदणी केली आहे काय?<br>असल्यास नोंदणी ठिकाण,नोंदणी क्रमांक/वर्ष व वैधतेची तारीख | होय/नाही (असल्यास) ठिकाण):-<br>नोंदणी क्रमांक :- दिनांक :-<br>वैधतेची तारीख :- |
| 14 | कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत थोडक्यात माहिती | |

मी असे प्रमाणित करतो/करते की आपले कार्यालयाअंतर्गत प्रकाशित केलेली अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षीत पद विशेष पदभरती मोहिमेअंतर्गत नामनिर्देशनाद्वारे भरण्यासंबंधी जाहीरात मी काळजीपुर्वक वाचली असुन सदर जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत.तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असुन नमूद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरीता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशिर कारवाईस पात्र राहील,याची मला जाणीव आहे.याबाबत नियुक्ती अधिकाऱ्याचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ :-

दिनांक :-

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)**
**नियम -2005 मधील प्रतिज्ञापनाचा नमुना**
**प्रतिज्ञापन**
**नमुना-अ**
**(नियम 4 पहा)**

मी,श्री./श्रीमती/कुमारी--------------------------------------------------------------------------- श्री.---------------------------------------------------------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी /पत्नी वय --------------वर्षे------------------- राहणार------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी----------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ------------- (संख्या) इतकी मुले आहेत.त्यापैकी दिनांक 28 मार्च,2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------------- आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च,2005 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी, अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी

**(अविवाहीत उमेदवारांनी नमुना-अ प्रतिज्ञापत्र लागू नाही असे नमुद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.)**